**महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा :- आहिल्यानगर**

# निवेदन

या निवेदनाद्वारे कळविण्यात येते की, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील प्रमुख, मृदविज्ञान विभाग या कार्यालयाकडील अ.भा.स.माती परिक्षण पीक प्रतिसाद प्रकल्पाच्या प्रक्षेत्रावरील खालील तपशिलाप्रमाणे आवळा झाडावरील फळांची विक्री निविदा पध्दतीने करावयाची आहे.

| अ.क्र. | बागेचे नांव | झाडे संख्या | अनामत रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|
| १. | आवळा फळबाग (अ.भा.स.माती परिक्षण पीक प्रतिसाद प्रकल्प) | १६२ | १०,०००/- |

आलेल्या सर्व निविदा **दिनांक २३/७/२०२५ रोजी दुपारी ३.००** वाजता उपस्थित असलेल्या निविदा धारकांसोबत मा. संशोधन संचालक तथा अध्यक्ष, फळबाग लिलाव समिती,म.फु.कृ.वि., राहुरी यांचे कार्यालयातील सभागृहात उघडण्यात येईल.

निविदा छापील फॉर्म व अटी प्रमुख, मृदविज्ञान विभाग, महात्मा फुले कृषि विद्यापिठ, राहुरी या कार्यालयात रोख रक्कम रु.५००/- भरुन मिळतील(कार्यालयीन वेळेत, सुट्टीचे दिवस वगळून).

१. निविदा फॉर्म विक्री दि.१५ /७ / २०२५ ते २२ /७/२०२५ पर्यंत
२. निविदा फॉर्म स्विकारण्याची दि.१५/ ७/२०२५ ते २२ /७/२०२५ (सं.६.०० वाजेपर्यंत)
३. निविदा उघडण्याची दि.२३ /७/२०२५ (दु. ३.०० वा.)

संपर्क फोन नं. (०२४२६) २४३२०९

**निविदा विक्रीच्या अटी व शर्ती विद्यापीठाच्या संकेतस्थळ www.mpkv.ac.in यावर बघण्यास मिळतील.**

सदस्य सचिव व मृदरसायनशास्त्रज्ञ
अ. भा स. माती परीक्षण पीक प्रतिसाद प्रकल्प,
महात्मा फुले कृषि विद्यापिठ,राहुरी

# निविदा किंवा लिलावाबाबत नियम व अटी

१. ज्या कोणाला निविदा भरण्यास भाग घ्यावयाचा असल्यास (अ) ठेकेदाराची ओळख पटविणारे मतदार ओळखपत्र/ आधारकार्ड/ पॅनकार्ड यापैकी एकाची छायांकित प्रत (ब) चेक बुक असलेल्या खात्याचे बँक पासबुकाच्यापहिल्या व शेवटच्या पानांची छायांकित प्रत, मागील सहा महिन्याच्या नोंदीची छायांकित प्रत (क) बागेचा लिलाव घेण्यास प्रतिबंधीत नसल्याचे उद्यानविद्या/ प्रमुख शास्त्रज्ञ बियाणे विभागाचा दाखला, (ड) मा. अधिदान व लेखा अधिकारी, म.फु.कृ.वि., राहुरी यांच्या नावे असलेला आवळा बागेसाठी भरावयाच्या रु. १०,०००/- सुरक्षा रकमेचा स्वतंत्र धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) आणि (इ) मागील २ वर्षाचे आयकर भरल्याचे विवरण पत्र हे सर्व एक नंबरच्या बंद तांत्रिक पाकिटामध्ये दयावे.

२. निवीदा फॉर्म दोन नंबरच्या बंद **"व्यापारी/दर" पाकीटामध्ये द्यावेत.** ही दोन्ही पाकिटे **तिस-या** पाकिटामध्ये टाकून मोहरबंद करुन पाकिटावर **"आवळा फळांची निविदा"** असे लिहावे व ते पाकिट प्रमुख, मृदविज्ञान विभाग, म.फु.कृ.वि., राहुरी, जि. अहमदनगर यांच्या कार्यालयात वेळेत पोहचेल अशा बेताने पाठवून द्यावेत.

३. फळबाग विक्री मंजूर झाल्यावर दुसऱ्या दिवशी फळबागेच्या एकूण किमतीच्या ५० टक्के रक्कम मा. अधिदान व लेखा अधिकारी, म.फु.कृ.वि.,राहुरी यांच्या नावे असलेल्या धनाकर्षाद्वारे दुस-या दिवशी भरावी लागेल व उर्वरीत ५० टक्के रक्कम फळांची तोडणी सुरु करण्यापुर्वी मा. अधिदान व लेखा अधिकारी, म.फु.कृ.वि.,राहुरी यांच्या नावे असलेल्या धनाकर्षाद्वारे या कार्यालयात जमा करावी लागेल. निविदा स्विकारल्यापासून ७ दिवसापर्यंत विभाग प्रमुखांना मुदत वाढ देता येईल. सदरील मुदत वाढ देताना विभाग प्रमुख हे मुदत वाढीचे कारण योग्य व पुरेसे वाटल्यावरच देतील. सदर मुदतीत रक्कम न भरल्यास तसेच शर्थ नं. १३ नुसार करारनामा व जामीन बाँड न दिल्यास निविदा रदद करण्यात येईल व विद्यापीठ नियमानुसार पुढील कार्यवाही करेल. आवळा तोडणी सुरु करण्यापुर्वी निविदा धारकाने पुर्ण रक्कम भरावयाची आहे. पुर्ण रक्कम भरल्याशिवाय आवळा तोडणीस परवानगी देण्यात येणार नाही.

४. आवळाफळांची तोडणी बागेतील अधिका-याच्या उपस्थीत करावी लागेल. सुट्‌टीच्या दिवशी आवळाफळांची तोडणी करता येणार नाही.

५. ज्या झाडांवरील आवळा फळे तोडली असतील ती त्याच झाडाखाली ठेवावी लागतील व बागेतील आवळाफळांची नोंदणी केल्यानंतर फळे उचलता येतील. ठेकेदाराने तोडलेल्या **फळांची नोंदणी रजिस्टर मध्ये सही करुन** नोंद करावी.त्याप्रमाणे विभागातर्फे गेट पास दिला जाईल. त्यानंतरच विभाग /प्रक्षेत्राबाहेर फळे घेऊन जाता येतील. या प्रकारच्या स्पष्ट सुचना विद्यापीठाच्या सुरक्षा अधिकारी व कर्मचा-यंना देण्यात आलेल्या आहे.

६. आवळा फळे झाडांवरुन तोडताना प्रक्षेत्रावरील ठिबक संच इत्यादीचे नुकसान झाल्यास संबंधीत निविदा धारकाकडून नुकसान भरपाई घेण्यात येईल.

७. निविदा स्विकृती दिल्यानंतर आवळाबागेची देखरेख, राखण, विक्री इ. सर्व जबाबदारी ही निविदा धारकाची राहील. आवळा बागेत विजेचा अनाधिकृत वापर कोणत्याही परिस्थितीत करता येणार नाही याची स्पष्ट नोंद ठेकेदाराने घ्यावी.

८. गरजेनुसार आवळा फळझाडांना ठिबक सिंचनाचे पाणी मिळेल तसेच आंतरमशागत व इतर आवश्यक कामे विभाग प्रमुखांचे तांत्रिक सल्यानुसार केली जातील. याबाबत निविदाधारकाचे बंधन अथवा सक्ती राहणार नाही.

९. निविदा स्विकारणे/ नाकारणे सर्वस्वी अध्यक्ष, फळबाग लिलाव समिती व मा. संशोधन संचालक, म.फु.कृ.वि, राहुरी यांचे अखत्यारीत राहील तसेच या निविदा पध्दतीने आवळा फळबाग लिलावाबाबतचे सर्व अधिकार खाली सही करणाराने राखून ठेवले आहेत. **निविदा उघडल्यानंतर निविदेतील रक्कम अपेक्षित रकमेच्या कमी असल्यास निविदा प्रक्रिया रद्द होवु शकते. परंतु तडजोडीने रक्कम वाढवुन मिळणेसाठी समिती निर्णय घेवु शकते.तथापि, दोन्ही बार्बीमध्ये अपेक्षित रक्कम न मिळाल्यास निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार मा.संशोधन संचालक यांना राहतील.अशा परिस्थितीत निविदा प्रक्रिया रद्द करुन जाहीर लिलावाची प्रक्रिया मा.संशोधन संचालक राबवु शकतात.**

१०. निविदा स्विकृतीनंतर नैसर्गिक आपत्तीने व इतर काही कारणाने आवळा बागेचे नुकसान झाल्यास अथवा उत्पन्न कमी आल्यास निविदा धारकाची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही किंवा याबाबत वेगळी सवलत मागता येणार नाही. तसा कोणताही अधिकार निविदा धारकास असणार नाही याची स्पष्ट जाणीव ठेवावी.

११. निविदा धारकाने कार्यालयीन वेळेतच फळांची काढणी करणे बंधनकारक आहे.

१२. संदर्भिय निविदा संबंधी काही तक्रार निर्माण झाल्यास त्याबाबत राहुरी न्यायदान क्षेत्रात खटले चालतील.

१३. निविदा धारकाने "आवळा फळांची विक्री बाबतची निविदा" मंजुर झाल्यानंतर परंतु फळांची तोडणी सुरु करण्यापूर्वी ५०० रुपये किंमतीच्या दोन स्टॅम्पवर त्यांची स्वत:ची तसेच दोन सॉलवंट शुअॅरीटीची साक्षीदारासह स्वाक्षरी असणारा "जामीन बॉण्ड" तसेच नियम व अटी मान्य असणारा "करारनामा" द्यावा लागतील. सदर दोन्ही बॉण्डचा खर्च निविदा धारकाने स्वत: करावयाचा आहे.

१४. निविदा फॉर्ममधील अटींचा भंग झाल्यास अनामत रक्कम व त्यानंतर इतर भरलेली रक्कम ही कायमस्वरुपी जप्त करण्यात येऊन,निविदांची उर्वरीत रक्कम व सदर बागेचे नुकसान झाल्यास त्या किंमतीच्या वसुलीसाठी विद्यापीठातर्फे कायेदीशीर कार्यवाही केली जाईल.

१५. निविदा मंजूर झाल्यानंतर आवळा फळांच्या विक्रीबाबत कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल विद्यापीठाकडून स्विकारली जाणार नाही. आवळा फळांच्या विक्रीची पुर्ण जबाबदारी ही सर्वस्वी निविदा धारकावर राहील याची नोंद घ्यावी.

१६. निविदाधारकाच्या कामगाराच्या जिविताची जबाबदारी निविदा धारकाची राहील.

१७. निविदा स्विकृतीनंतर, ठेकेदार यांना जे कामगार फळांची काढणीसाठी ठेवावयाचे आहेत त्यांचा **"कामगार नुकसान भरपाई कायदयानुसार"** भरपाई दयावयाचे बाबतचा विमा हा परस्पर उतरविणे बंधनकारक राहील. कामगारांना काही नुकसान भरपाई देय झाल्यास ती पुर्णपणे निविदाधारकाने दयावयाची आहे. या बाबत कृषि विद्यापीठास कोणत्याही प्रकारे तोशिष लागू होणार नाही. तसेच याबाबत काही आकस्मिक आर्थिक नुकसान विद्यापीठ निविदाधारकाकडून सदरील नुकसान वसुल करील.

१८. यदाकदाचित निविदा धारकाने टेंडर मंजुर झाल्यावर आवळा बाग घेतली नाही तर अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व निविदा धारकास किंवा त्यांच्या कुटुंबातील इतर सदस्यांना पुढील पाच वर्षापर्यंत कोणत्याही फळबागेची निविदा भरता येणार नाही.

१९. निविदाधारक व त्यांनी नेमलेल्या मजुरांनाच फक्त बागेत प्रवेश मिळेल. इतर व्यक्तीना बागेत प्रवेश दिला जाणार नाही.निविदाधारकाशिवाय इतर व्यक्तीचे म्हणणे ऐकूण घेतले जाणार नाही.तसेच निविदाधारक उपठेकेदार ठेवु शकणार नाही.

२०. कोणताही ठेकेदाराला कामावर बाल मजुर ठेवू शकणार नाही. असे आढळल्यास ठेकेदाराविरुध्द फौजदारी तक्रार दाखल केली जावू शकते.

२१. निविदा उघडतांना निविदा धारकाने स्वत:च हजर राहणे आवश्यक आहे. हजर राहणे शक्य नसल्यास प्रतिनिधी जवळ संमतीपत्र असणे आवश्यक आहे.

२२. म.फु.कृ.वि.राहुरी ही संस्था शासकीय असल्याने तीस केंद्रिय माहिती अधिकार अधिनियम २००५ हा कायदा लागू आहे.त्यामुळे ठेकेदारासंबंधीची माहिती कोणालाही उपलब्ध केली जाऊ शकते.

२३. कृषि उत्पन्न बाजार समिती, राहुरी समितीच्या अधिकारानुसार व नियमानुसार आवळाफळांच्या खरेदी व्यवहारावर बाजार फी व देखरेख फी निविदा धारकास बाजार समितीत भरावी लागेल.

२४. आवळा फळ काढण्याचा कालावधी दिनांक **३० / १२/२०२५** पर्यंत राहील त्यानंतर कोणतीही मुदतवाढ मिळणार नाही.

- निविदा फॉर्म विक्री दि.१५ /७ /२०२५ ते दि. २२ / ७ /२०२५ पर्यंत (कार्यालयीन वेळेत, सुट्टीचे दिवस
- वगळून)
- निविदा फॉर्म स्विकारण्याचा दि.१५/ ७ /२०२५ ते दि.२२/ ७ /२०२५ (सं.६.०० वाजेपर्यंत)
- निविदा उघडण्याचा दि.२३ /७ /२०२५ (दु. ३.०० वा.)

**वरील अटी व शर्ती मला मान्य आहेत.**

निविदा भरणाराची सही व नाव